# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४०६/२०२३ दिनांक — २७/११/२०२३

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणा-या आरोपीतास उत्तरप्रदेश येथुन पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्रौ ०९.२५ वाजताचे सुमारास नालासोपारा पुर्व तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील फिर्यादी यांची मुलगी हि त्यांचे राहते बिल्डींगचे खाली असलेल्या किराणा दुकानातुन साखर घेवुन घरी येत असताना एक अनोळखी आरोपीत याने फिर्यादी यांची मुलगी हिला म्हणाला की, तेरी मम्मी तुझे आवाज दे रही है असे खोटे बोलुन तिचे तोंड दाबुन तिला खेचत आडोश्याला नेऊन तिचेवर लैंगिक अत्याचार करुन घटनास्थळावरुन पळुन गेला. सदर बाबत तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८११/२०२३ भा.द.वि.स कलम ३७६ AB, ३५४, ३२४ बांलकाचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम ४,६,८,१०,१२ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर संवेदनशील घटनेची मा. वरिष्ठ अधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेऊन आरोपीत निष्पन्न करुन अटक करणे बाबत दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखेचे ३ पोलीस पथके तयार करुन गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन एक पुरुष आरोपीत वय २३ वर्षे यास दिनांक २५/११/२०२३ रोजी वाराणसी शहर, राज्य उत्तर प्रदेश येथुन गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार च्या पथकाने, एस.टी.एफ. वाराणसी राज्य उत्तरप्रदेश यांचे मदतीने ताब्यात घेवुन अटक केली असुन आरोपीत याचा ट्रान्झीट रिमांड घेवुन त्यास पुढील कारवाई करीता तुळींज पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सचिन घेरे, मनोज सकपाळ, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, युवराज वाघमोडे म.सु.ब. गणेश यादव, सागर सोनवणे, प्रविण वानखेडे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ विरार व स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.


गुन्हे शाखा
मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय
विरार कक्ष - ३
CRIME BRANCH
VIRAR UNIT - 3